**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळाव्यात ५१ हजार युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप

- आंध्रप्रदेशात बस अपघातात २० जणांचा मृत्यू

- इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्राची मान्यता

**आणि**

- जाहिरात क्षेत्रातले दिग्गज पियुष पांडे यांचं मुंबईत निधन

**<><><><>**

देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी नवी दिल्लीतल्या सतराव्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून संबोधित करताना म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरणाचा कार्यक्रम आज सतराव्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून देशभरात होत आहे. या रोजगार मेळाव्यात वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये पद मिळालेल्या ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत ११ लाख नियुक्त्या करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

या मेळ्याचा भाग म्हणून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते ८० उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली गेली. आज नियुक्तीपत्र मिळालेल्या सगळ्यांनी स्वतःला तंत्रज्ञान, नवोन्मेष, संशोधन, तसंच व्यवस्था परिवर्तनाच्या अनुषंगानं अद्यायवत ठेवावं असं आवाहनही शेलार यांनी यावेळी केलं. याविषयी उमेदवारांनी आकाशवाणीकडे समाधान व्यक्त केलं.

**होल्ड - उमेदवार बाइट**

या मेळ्याचा भाग म्हणून नागपूर इथं आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २५ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात, तर एकूण ११३ जणांना नियुक्तीपत्रं दिली गेली.

<><><>

आंध्र प्रदेशमध्ये कुर्नुल इथे आज पहाटे खाजगी प्रवासी बसला लागलेल्या आगीत किमान २० जणांचा मृत्यू झाल्याच कुर्नुलच्या पोलीस अधीक्षकांनी म्हटलं आहे. हैद्राबादहून बंगळुरूला जाणाऱ्या या खाजगी बसमध्ये ४१ प्रवासी होते, त्यातल्या २१ प्रवाशांना वाचवण्यात यश आलं असून त्यांना रुग्णालयात दाखल केल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. दुचाकीला धडक झाल्यानंतर या बसनं पेट घेतला. त्यात बसचा दरवाजा उघडता न आल्यानं प्रवाशी बाहेर पडू शकले नाहीत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीतून मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपयांची आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर झाली आहे.

आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनीही या अपघाताप्रकरणी शोक व्यक्त केला असून मदतीचं आश्वासन दिलं आहे.

<><><>

बेकायदेशीर बांग्लादेशी नागरिकांची काळी यादी तयारी करुन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही याची खात्री करावी असे निर्देश राज्य सरकारनं दिले आहेत. दहशतवाद विरोधी पथकानं गुन्हा दाखल केलेल्या पावणे तेराशे बेकायदेशीर बांग्लादेशी नागरिकांवर कुठलंही अधिकृत दस्तऐवज असेल तर ते रद्द करण्याचे आदेशही सरकारनं दिले. शिधापत्रिकांचं वितरण करताना कागदपत्रांची किंवा निवासाची काटेकोर पडताळणी करावी, असंही या आदेशात म्हटलंय.

<><><>

राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातल्या जैवविविधता संवर्धनासाठी १ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये राज्यात सातारा जिल्ह्यातल्या साखरवाडी आणि पुणे जिल्ह्यातल्या कुंजीरवाडी या गावांची निवड झाली

असून तिथल्या जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना प्रत्येकी पंचेचाळीस लाख पन्नास हजार रुपयांचा निधी मिळणार आहे.

**<><><><>**

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर गावाचं नाव ईश्वरपूर करायला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे. यासंदर्भात राज्य सरकारनं केंद्राला प्रस्ताव पाठवला होता.

**<><><><>**

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं मुंबईत निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गाने आजारी होते.

ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना २०१६ साली पद्मश्री ने सन्मानित करण्यात आलं होत.

भारतीय जनता पक्षाच्या ‘अबकी बार मोदी सरकार’ या जाहिरातीचे, तसंच पोलिओ लस अभियानाच्या ‘दो बूंद जिंदगी के’ या जाहिरातींचे ते जनक होते. कॅडबरी डेरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन इत्यादी अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनीच यशस्वी केल्या होत्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

भंडारा जिल्ह्यात निकृष्ट बांधकामांचा जाब विचारल्याबद्दल एका ग्रामपंचायत सदस्या आणि तिच्या पतीला मारहाण करण्यात आली. लाखांदूर तालुक्यातल्या खोलमारा गावातल्या आरओ प्लांटचं बांधकाम निकृष्ट झाल्याचा त्यांचा आरोप होता. कामाच्या अंदाजपत्रकाची मागणी केल्याप्रकरणी इतर सरपंच महिलेच्या पतीसह इतर ४ जणांवर ॲट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल झाले आहेत.

**<><><><>**

दिवाळीनंतरच्या सुट्यांच्या मोसमात सध्या संतनगरी शेगाव येथे भाविकांची विक्रमी गर्दी झाली आहे. राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी सध्या शेगाव भरुन गेले आहे. दर्शनासाठी मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी संत गजानन महाराज संस्थान च्या वतीने समाधी आणि श्रीमुख दर्शन त्याचप्रमाणे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><>

नंदूरबारमध्ये अंस्तंभा यात्रेवरुन परतणाऱ्या भाविकांना गेल्या आठवड्यात अपघात झाला होता. या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबियांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं दहा हजार तर जखमींना प्रत्येकी पाच हजाराची मदत दिली आहे.

<><><>

देशात लवकरच भारत टॅक्सी ही सहकारी तत्त्वावरची टॅक्सी सेवा सुरू होणार आहेत.

सुरुवातीला दिल्ली, महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांमध्ये या प्रकल्पाचा प्रायोगिक टप्पा राबवला जाईल, आणि त्यानंतर टप्प्याटप्प्यानं संपूर्ण देशभर या सेवेचा विस्तार केला जाईल. अशाप्रकारची ही देशातील पहिलीच सहकारी टॅक्सी सेवा ठरणार असून, मल्टी-स्टेट सहकारी टॅक्सी कोऑपरेटिव्ह लिमिटेड अंतर्गत ती कार्यरत राहील असं मंत्रालयानं म्हटलं आहे. या उपक्रमाअंतर्गत चालक हे फक्त नोकर नसून सहकारी संस्थांचे सह मालक असतील. त्यामुळे या व्यवसायातला नफा थेट चालकांपर्यंत पोहोचेल, त्यांची आर्थिक पिळवणूक थांबेल आणि त्यांना व्यवसायात सन्मानासह सहभाग मिळेल असं सहकार मंत्रालयानं म्हटलं आहे.

या सेवेअंतर्गत खाजगी ॲप आधारित सेवांमध्ये चालकांकडून घेतलं जाणारं अतिरिक्त कमिशनचा भाग पूर्णतः वगळण्यात आला आहे, त्यामुळे चालकांचं मासिक उत्पन्न वाढू शकणार आहे. यासोबतच या सेवेअंतर्गत प्रवाशांसाठीही परवडणारे दर ठेवले जाणार आहेत.

<><><>

तेलंगणाच्या मंत्रिमंडळानं राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी दोन अपत्यांच्या निर्बंधाची अट रद्द करायला मान्यता दिली आहे. आता या सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार एक अध्यादेश जारी करून, तो राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठवणार असल्याचं तेलंगणाचे महसूल मंत्री पी. श्रीनिवास रेड्डी यांनी बातमीदारांना सांगितलं.

<><><>

हवामान बदलाची परिस्थिती लक्षात घेता गेल्या काही वर्षांप्रमाणे देशात थंडीची लाट येण्याची शक्यता गृहीत धरुन त्यासाठी पूर्वतयारी करावी असी सूचना राष्ट्रीय मानवाधिकार

आयोगाने १९ राज्य सरकारे आणि ४ केंद्रशासित प्रदेशांना दिली आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीत थंडीच्या लाटेमुळे ३ हजार ६३९ मृत्यूंची नोंद झाल्याची माहिती आहे. विशेषतः दुर्बल समाजघटकांना थंडीच्या तडाख्यापासून संरक्षण देण्याच्या हेतूने मानवाधिकार आयोगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन आयोगाला मार्गदर्शकपर सूचना केल्या आहेत.

**<><><><>**

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी युवा स्पर्धांमध्ये १८ वर्षांखालील मुलं आणि मुलींच्या भारतीय कबड्डी संघानं सुवर्ण पदक पटकावलं आहे. मुलींच्या संघानं इराणला ७५-२१ असं १२ वर्षातल्या सर्वात मोठ्या फरकानं नमवलं. मुलांच्या संघानं इराणला ३५-३२ असं हरवलं.

या स्पर्धेत मुलींच्या १०० मीटर अडथळ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत ठाण्याची शौर्या अंबुरे हिला रजत पदक मिळालं.

**//<><><><>//**